: प्रकरण पाचवे :

## मराठी ग्रामीण कथेत उद्धव ज.शेळके यांचे योगदान

## : प्रकरण ५ वे :

## मराठी ग्रामीण कथेत उद्धव ज. शेळके यांचे योगदान

मागील प्रकरणात उद्धव ज. शेळके यांच्या "कडूनिंबाची सावली" या व्यक्तिचित्रसंग्रहाचा अभ्यास केला. हा अभ्यास व्यक्तीचा सामाजिक स्तर, त्यांची जीवनदृष्टी, निवेदक आणि व्यक्ती यामधील भावबंध या अंगाने करून मूल्यमापन केले. या मधून त्यांच्या व्यक्तिचित्रांचे वेगळेपण तपासले व त्यांच्या मर्यादाही पाहिल्या.

उद्धव ज.शेळके यांचे मराठी कथेला काय योगदान आहे याचा विचार या प्रकरणात करावयाचा आहे. उद्धव ज.शेळके हे १९६० नंतरचे महत्त्वाचे कादंबरीकार आणि कथाकार आहेत. त्यांच्या कथेने मराठी कथेला काय दिले हे पाहताना मराठी कथेची परंपरा पाहिल्याशिवाय शेळक्यांचे वेगळेपण तपासता येणार नाही. किंवा त्यांच्या कथा वैशिष्ट्यांचा विचार पूर्ण होणार नाही. खरी ग्रामीण-प्रादेशिक कथा १९३१ च्या दरम्यान "सहयाद्रिच्या पायथ्याशी" या वि.स.सुखटणकरांच्या कथासंग्रहात आढळते. यामधील कथा कोकणच्या प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर घडतात. सुखटणकरांनी मराठी ग्रामीण कथेला ग्रामीणतेची खरी पार्श्वभूमी मिळवून दिली.

सुखटणकर आणि लक्ष्मणराव सरदेसाई यांच्यानंतर ठळकपणे नाव घ्यावे लागते ते श्री.म.माटे यांचे. त्यांचे "उपेक्षितांचे अंतरंग" आणि "माणूसकीचा गहिवर" हे ग्रामीण कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

श्री.म.माटे यांच्या "उपेक्षितांचे अंतरंग" व "माणूसकीचा गहिवर" या

कथासंग्रहामध्ये त्यांनी ग्रामीण भागातील उपेक्षित गुन्हेगारी समाजाचे चित्रण केले आहे. त्यात बन्सीधर, सावित्री, पि-या सारख्या व्यक्तींचे एकाकी आणि हतबल आयुष्य चित्रित केले आहे. श्री.म.माटे गांधीवादी, समाजवादी विचाराने प्रेरीत झालेले होते. यामुळे त्यांचा पिंड समाजसुधारकांचा होता. समाजसुधारणेच्या तळमळीतून त्यानी ग्रामीण जीवन समजून घ्यायचा प्रयत्न केला आहे. यामुळे ते ग्रामीण परिसरातील वस्तुस्थिती पाहून अतिशय अस्वस्थ झाले. या अवस्थेच्या आणि माणूसकीच्या गहिवराने त्यांनी ग्रामीण कथा लिहिल्या आहेत.

माणूसकी आणि समाजसुधारणेची तळमळ ग्रामीणतेविषयी ओढ यामुळे त्यांच्या कथांना समाजसुधारणेचे रूप लाभले आहे. त्यामुळे त्यांच्या कथा माणूसकीने ओथंबलेल्या वाटतात पण येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ते प्रचारकी समाजसुधारक नव्हते. यामुळे त्यांना जे अनुभव आले आणि भावले तेच त्यांनी आपल्या कथेतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना माणसे महत्त्वाची वाटली आणि म्हणूनच ते त्यांच्या जीवनातील कारूण्य अनुभवू शकले व कथेत अभिव्यक्त करू शकले.

ग.ल.ठोकळ व श्री.म.माटे समकालीन लेखन करणारे ग्रामीण कथाकार आहेत. "गावगुंड" या कादंबरीने लोकप्रिय झालेल्या ठोकळांनी ग्रामीण कथांही लिहिल्या आहेत. त्यांच्या कथेत जीवनानुभव असले तरी त्यांची अभिव्यक्ती मात्र रंजनाच्या मुशीतच झाली. फडके यानी मराठी कथेला जी तांत्रिक बैठक प्राप्त करून दिली त्याच तंत्रात ठोकळांनी कथा निर्माण केली, एका अर्थाने त्यांनी ग्रामीण कथेला कलात्मकता दिली. त्यांनी कथेतून ग्रामीण जीवनाचा व्यापक आशय चित्रित केला. ठोकळांनी फडक्यांच्या बरोबरच कथा लिहून कथेत अधिक महत्व घटनाप्रधानतेला दिले. तर त्याचवेळी तिला मनोरंजकही बनविले. या संदर्भात आनंद यादव म्हणतात, "माटे यांना मराठी कथेचे हरिभाऊ म्हटले तर ठोकळ यांना फडके म्हणावे लागेल. ना.सी.फडके यांनी मराठी कथेला

जे स्वरूप दिले तेच स्वरूप ग्रामीण कथेला काही प्रमाणात ग.ल.ठोकळ यांनी दिले." (१)

ग.ल.ठोकळांनंतर ठळकपणे व्यंकटेश माडगूळकर यांचे नाव लक्षात येते. गाडगीळ, गोखले आदि नवकथाकारांच्या पंगतीत बसलेले माडगूळकर ग्रामीण जीवन यथार्थपणे चित्रित करताना दिसतात. नवकथा ज्या अंगानी विकसित होत होती, त्याच अंगाने माडगूळकर ग्रामीण कथा विकसित करीत होते. माणदेशचा परिसर त्यांनी जिवंत केला आहे. माणदेशात जगणारी माणसे, दुष्काळ, बारा बलुतेदार, दारिद्रय, शेती संस्कृतीचे जीवन इत्यादी अनेक गोष्टी त्यानी चित्रित केल्या आहेत.

व्यंकटेश माडगूळकरांचे "माणदेशी माणसे", "काळी आई", "गावाकडच्या गोष्टी" आदी कथासंग्रह प्रसिद्ध अहेत. "बनगरवाडी" नेही कादंबरी लेखनाच्या काही दिशा सूचित केल्या आहेत.

व्यंकटेश माडगूळकरांनी केवळ ग्रामीण जीवनाचा ध्यास घेतला नव्हता, तर ते अधिक कलात्मक बनवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या दृष्टीने त्यानी भाषेचा केलेला वापर उल्लेखनीय आहे. नागर भाषेतच निवेदन असले तरी त्यांनी ग्रामीण भाषेचा चपखल वापर संवादांमधून केला आहे. ग्रामीण आणि नागर भाषेतील अंतर कमी करून भाषेचा केलेला त्यांचा प्रयोग उल्लेखनीय आणि अधिक परिणामकारक आहे. यांच्या कथेतून व्यक्त होणारे जीवन पूर्वसुरीचे असले तरी अभिव्यक्ती मात्र वेगळी होती. अनुभवाची मांडणी, त्यांची सूक्ष्मता, तरलता, घनता त्यानी कथेतून टिपली आहे. त्यामुळे त्यांची कथा एकाचवेळी कसदार ग्रामीण जीवन चित्रित करीत होती, तर त्याचवेळी कलात्मक पातळीवर अधिक परिणामकारक आणि प्रगल्भ बनत होती. व्यंकटेश माडगूळकरांच्या मागेपुढे शंकर पाटील यांची कथाही उठून दिसत होती. माडगूळकर ग्रामीण जीवनाचे चित्रण तटस्थपणे आणि चित्रमय पद्धतीने करत होते, तर शंकर पाटलांची कथा मानवी मनाच्या गुंतागुंतीवर

अधिक लक्ष केंद्रित करीत होती. मानवी मनातील गुंतागुंत, उलटसुलट विचार, आंदोलने चित्रित करू लागल्याने त्यांच्या कथेला मनोविश्लेषणाची बाजू लाभली होती. त्यांच्या "आभाळ", "वेणा", "भूजंग", "वळीव" सारख्या कथा अधिक परिणामकारक आहेत. कथेत एखादी घटना असते पण त्या घटनेचे व्यक्तीच्या मनावर काय परिणाम होतात याचे चित्र रंगवण्यात शंकर पाटील रंगून जातात. साहजिकच त्यांच्या कथेला अधिक खोली प्राप्त झाली आहे. त्यामुळे खेडयातील ग्रामीण जीवनाबरोबर त्यानी ग्रामीण मने अधिक प्रगल्भपणे व्यक्त केल्याने ग्रामीण कथेला अधिक परिणामकारकता, कलात्मकता लाभली. या दृष्टीने शंकर पाटलांच्या कथा उल्लेखनीय आहेत.

ग्रामीण जीवनाला विनोदाची डूब द्यायचा प्रयत्न द.मा.मिरासदार यांनी केला आणि तो यशस्वी झाला. खरी विनोदी ग्रामीण कथा द.मा.मिरासदारांनी लिहिली. विनोदाची बाजू एकदा स्वीकारली की सर्वसामान्यांपेक्षा वेगळया असणाऱ्या वल्लीच त्यांना निवडाव्या लागल्या. ही त्यांच्या कथेची मर्यादा मान्य करूनही ग्रामीण भागातील माणसांचे नमुने, वातावरण ते भाषेच्या उत्कट, तरल आणि परिणामकारक वापराने अधिक परिणामकारक करतात. कथेतील वातावरणाला ग्रामीण परिसराच्या रंग, माती, गंधाचा स्पर्श आहे. यामुळे ग्रामीण कथेला वेगळे परिमाण लाभले आणि ती अधिक दिशांनी विकसित व्हायला मदत झाली. अशाप्रकारे द.मा.मिरासदारानी ग्रामीण कथेला वेगळे परिमाण दिले.

वरील कथालेखकांच्या कथांचा अभ्यास आणि त्यांची वैशिष्ट्ये नजरेसमोर असल्याशिवाय उद्धव ज. शेळक्यांच्या कथेचे वेगळेपण तपासता येणार नाही. हरिभाऊ ते माटे आणि अलीकडचे माडगूळकर, पाटील, मिरासदार यांचा मराठी ग्रामीण कथेवर फार मोठा प्रभाव आहे. हरिभाऊंनी निर्माण केलेल्या कथेला ठोकळांनी अधिक कलात्मक आणि परिणामकारक बनवण्याचा प्रयत्न केला आहे. तर ग्रामीण कथेला नवकथेच्या दालनात प्रवेश मिळवून देण्यात व्यंकटेश माडगूळकरांची कथा आघाडीवर आहे. त्यामुळे माडगूळकर

नवकथाकार ठरतात. नवकथाकार असे म्हणताना त्यांच्या कथेने काय वेगळेपण जोपासले हे पाहताना त्यांची कथा नागर कथेशी समांतर वाटचाल करीत होती. नागरकथेत माणसाचे तुटलेपण, हतबलता, निराशा, अस्वस्थता, बेकारी आदी गोष्टीना स्थान होते. तर त्याचवेळी माडगूळकर ग्रामीण जीवनातील हीच परिस्थिती चित्रित करीत होते. ग्रामीण व्यक्तीचे दारिद्र्य, हतबलता, एकाकीपणा, जातीयता, दुष्काळ शेती आदी विषय त्यांच्या कथेत येत होते. त्याना कलात्मकतेची जाण असल्याने त्याने नवकथेप्रमाणे अभिव्यक्ती केल्याने ग्रामीण कथाकार म्हणून ते नवकथाकार ठरले आहेत.

शंकर पाटील आणि द.मा.मिरासदार यानी मराठी कथेला मनोविश्लेषण आणि विनोद ही परिमाणे दिली त्यामुळे गाडगीळ गोखले यांच्या कथेतून व्यक्त होणारी मनोविश्लेषणात्मकता शंकर पाटील यांच्यामुळे मराठी ग्रामीण कथेला लाभली. त्याचवेळी द.मा.मिरासदार यांच्या विनोदाच्या परिमाणामुळे कथा अधिक प्रगल्भ परिणामकारक आणि विकसित बनली. यामुळे कथेला अनुभवनिष्ठा, आत्मनिष्ठा आणि कलानिष्ठा प्राप्त झाली. त्यामुळे मराठी ग्रामीण कथेच्या विकासातील माडगूळकर, पाटील, मिरासदार ही त्रयी महत्त्वपूर्ण आहे.

उपरोक्त कथालेखक आणि कथेची परंपरा नजरेसमोर ठेवून उद्धव ज. शेळके यांच्या कथेचे मूल्यमापन करावे लागते. उद्धव ज. शेळके हे साठ नंतरच्या पिढीतले महत्त्वाचे कादंबरीकार आणि कथाकार आहेत. त्यांची 'धग' ही १९६० साली प्रकाशित झालेली कादंबरी अतिशय महत्त्वपूर्ण आणि ग्रामीण कादंबरीचा उत्कृष्ठ अविष्कार म्हणावा लागेल. 'धग' मधील व्यक्ती आणि समष्टी व नियती यांच्यातील संबंधाचा वेध घ्यायचा प्रयत्न ग्रामीण परिसराला आणि जीवनाला वेगळेपण देवून जाणारा आहे. त्यानी ग्रामीण कथेतूनही वैदर्भीय ग्रामीण जीवनच चित्रित केले आहे.

उद्धव ज. शेळके १९५८ पासून लेखन करीत आहेत त्यांचा "शिळान अधिक आठ कथा" हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला आहे. यानंतर त्यांचे "आसरा", "वानगी", "हिरवी झुळुक", "संसर्ग", "गरीबाघरची लेक", "कडूनिंबाची सावली" इत्यादी कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत.

शेळके यांच्या कथासंग्राहातून व्यक्त होणारे ग्रामीण जीवन आणि विशेष आपण पाहू. दारिद्रय हे माणसाच्या पाचवीलाच पूजले आहे. या जगात पाऊल ठेवले न ठेवले एवढयात जणू दारिद्रयाने त्यांच्यावर झडप घातलेली आहे आणि म्हणूनच दारिद्रयाशी झगडत राहणे त्याना अपरिहार्य होऊन बसले आहे. त्यांच्या कथेतल्या व्यक्ती भूक भागविण्यासाठी सतत धडपडतात त्यांचे वागणे, बोलणे, चालणे या सर्वांमधून आक्राळ विक्राळ भूक डोकावताना दिसते. ही भूक भागविण्यासाठी त्यांची सतत धडपड चाललेली असते. कमाईचा आणि जगण्याचा ही माणसे येथे हिशोब मांडतात. त्यांचा मेळ घालण्याचा ते प्रयत्न करतात. पण हा मेळ सहसा लागलेला दिसत नाही पोट भरण्याच्या त्यांच्या या धडपडीतूनच त्यांचे बरेचसे दुःख जन्माला आलेले आहे. पण दारिद्रयापोटीच हे दुःख जन्माला आलेले आहे. पण दारिद्रयापोटीच हे दुःख निर्माण झालेले आहे असे नाही त्याला इतरही काही कारणे आहेत आणि ती कारणे देखील तेवढीच महत्त्वाची आहेत. "लेकुरवाळी" या कथेत शेवंताला बाळांतरोग झालेला आहे. या बाळांतरोगात आपल्याला काही तरी बरे वाईट होणार आहे. आपण निश्चित या जगातून जाणार आहोत. हे तिला कळून चुकलेले आहे. आपण मरणार याचे तिला वाईट वाटत नाही तर आपल्या माघारी चिल्यापिल्यांचं कसं होणार हीच तिला काळजी लागलेली आहे आणि त्या काळजीच्यापोटीच तिचे दुःख निर्माण झाले आहे. "अगतिकता" या कथेत अगतिक असहाय माणसे प्रसंगी आत्मसमर्पणालाही तयार होतात. "बा" मेल्यानंतर छेड काढणा-या येशालाच रंगी शरण जाते. अशा प्रकारचा आशय "अगतिकता" या कथेत शेळके रेखाटताना दिसतात.

"दुःख", "पावसाळा", "भांडण" या कथेतले दुःख वेगळया स्वरूपाने व्यक्त होते. दैनंदिन जीवन जगावे लागत असताना कराव्या लागणा-या हालचालीतून ते दुःख व्यक्त झालं आहे.

दरिद्री माणसाच्या मनातील हयाप्रकारचे ताणतणाव आणि आंदोलने चित्रित करताना शेळके छोटया मोठया प्रसंगाची अशी काही सुंदर गुंफण करतात की ही माणसे जीवनात कुठलेही सुख नसताना स्वतः जगतात कशी आणि स्वतः जगता जगता इतरांची काळजी वाहत त्याना सांभाळतात तरं कशी याचा प्रश्न पडावा मानवी मनाचे सुक्ष्म पदर अभिव्यक्त करण्यात उद्धव ज. शेळके यांचे सामर्थ्य व्यक्त होते. यात शंका नाही.

याचबरोबर त्यांच्या कथेत खालच्या जातीतील स्त्रीयावर होणारे अन्याय, गावातील जातीतील स्त्रीयावर होणारे अन्याय, गावातील पाटलाचे वागणे तसेच गुन्हे करून तरीही अभिमानाने जगण्याचा प्रयत्न करणा-या व्यक्ती घरातील ताणतणाव इत्यादी अनेक विषय त्यांच्या कथेतून येतात हे जोवन चित्रित करण्यासाठी त्यानी वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा वापर अधिक समर्थपणे केला आहे. त्यामुळे त्यांच्या कथेतून प्रकट होणारे ग्रामीण जीवन अधिक परिणामकारक बनले आहे.

"कडूनिंबाची सावली" या व्यक्तिचित्रण संग्रहामध्ये व्यक्ती वेगवेगळया स्तरातील आहेत. लेखकाच्या लहानपणापासून ते त्यांच्या उमेदीच्या काळापर्यंत ज्या अनेक व्यक्ती भेटल्या त्यापैकी त्यांच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव टाकून गेल्या त्यांची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने प्राथमिक शिक्षक, घरमालक, मित्र, वृतपत्र संपादक अशा अनेक व्यक्ती येतात.

"बाई" व "चवदार भाबी" या दोन व्यक्तिचित्रात स्त्रियांचे चित्रण आलेले

आहे. "बाई" मधील अंजनाबाई या शिक्षिका असतात. लेखकाला लहानपणी त्या शिकवायला होत्या. लेखकाविषयी बाई अस्थेने चौकशी करतात. प्रामाणिकपणे कष्ट करून मुलाना शिकवूनही आपली जात आपल्याला टाकता आली नाही. म्हणून अंजनाबाई पेटवून घेतात. जातीयतेची पाळेमुळे माणसाच्या मनात किती खोलवर रूजली आहेत याचा प्रत्यय या व्यक्तिचित्रणातून येतो.

"चवदार भाबी" मधील भाबी आईच्या गैरहजेरीत लेखकाला जेवण वगैरे देते घरोब्याचे संबंध वाढत जातात. एक दिवस लेखक घरात कुणी नाही हे पाहून भाबीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. पण भाबी आपल्या नवऱ्याला सांगत नाही. यामधून भाबीच्या अंतर्मनाच दर्शन होते.

नोकरीसाठी मुंबईला गेल्यावर भेटलेला अमरावतीचा मारोती खुळ्या मनाने नोकरी लागेपर्यंत लेखकाला आपल्या खोलीत ठेवून घेतो. बाबा आंबेकर आणि राम या दोन व्यक्ती शेळक्यांच्या जीवनात महत्वाच्या ठरल्या आहेत. घरमालक हे एक मित्र म्हणून तर कधी बाबासारखे वागतात. हातोहात फसवणाऱ्या व्यक्ती सुद्धा लेखकाना भेटल्या आहेत यामध्ये नाना बंडोपंत इ. व्यक्ती आहेत. 'कडूनिंबाची सावली' मधील व्यक्तींचा स्तर हा सर्वसामान्य असल्यामुळे त्यांच्यातला माणूस जिवंत दिसतो. एकमेकाशी सहकार्याने वागणाऱ्या, स्वार्थाने वागणाऱ्या, निस्वार्थी भूमिका घेणारे अशा अनेक वृत्ती प्रवृत्तीच्या व्यक्ती भेटतात.

उद्धव ज. शेळके यांच्या कथा केवळ वर्णनात्मक नसून त्या विश्लेषणात्मक असतात. त्याच बरोबर त्यांच्या कथेत एखादया घटनेभोवती असणारी आणि निर्माण होणारी सामाजिक परिस्थिती आधाराला घेत नाहीत. तर त्या घटनेचे परिणाम मानवी मनावर काय होतात याचा ते बारकाईने विचार करतात त्यांच्या कथेत एकाचवेळी ग्रामीण जीवन

मनोविश्लेषण आणि हे मनोविश्लेषण बाहयघटनांच्या आधारे ते अधिक परिणामकारक करतात. नागनाथ कोत्तापले म्हणतात, "उद्धव ज. शेळके यांनी वैदर्भीय बोलीला अधिक गहिरे बनविले आहे. आणि नव्याने त्यांनी भाषेचा वापर केला आहे. त्यांच्या या बोलीतून लीळाचरित्रासारख्या प्राचीन गद्यातील भाषेची आठवण होते. अधिक तरल संवेदनशील भाषेचा वापर केल्यामुळे त्याना वैदर्भीय भाषेचा अधिक निकट स्पर्श झाला आहे व तो त्यांनी अधिकच परिणामकारक बनवण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे त्यांचा वैदर्भीय भाषेचा समर्थ वापर करणारे लेखक या शब्दात नागनाथ कोतापल्ले यांनी गौरव केला आहे." (२)

त्यांच्या कथेतून चित्रित होणाऱ्या व्यक्तिरेखा दारिद्रयाने खंगलेल्या असल्या तरी संयम राखताना दिसतात. यांच्या व्यक्तिरेखा विषयी रा.गो.चवरे लिहितात, "दिवसभर काबाडकष्ट करूनही शेवटी अर्धपोटी राहणे यातून त्यांची कित्येक पात्रे खंगलेली असली तरी त्यांचा सोशिकपणा आणि संयम वाखाणण्यासारखा आहे. अवतीभोवतीच्या वातावरणाचा परिपाक शिक्षणाचा व संस्काराचा अभाव यातून या माणसांची रांगडी व शिवराळ बोली. अपरिहार्यतेचा भाग म्हणून येते पण त्यात अश्लीलता नाही अश्लील शिवी बुद्धयाच गाळून तेथे xxy अशा फुल्या मारतात. वासनेच्या गहिऱ्या चित्रणातही विकृती येत नाही." (३)

उद्धव ज. शेळके अशा प्रकारे वैदर्भीय जीवन उभे करतात त्यांच्या व्यक्ती दुःख भोगण्यासाठीच जन्माला आलेल्या असतात. वैदर्भीय जीवनातील सर्व सामान्यांचे दुःखच त्यानी आपल्या कथेत टिपले आहे. व्यक्ती दुःख भोगत असताना तो जीवनाचा एक अपरिहार्य भागच आहे असे समजून जगत असतात. या दुःखाबद्दल ती अस्वस्थ होत नाहीत अवास्तव दुःखाला महत्व देत नाहीत. आहे हे जीवन आपल्या वाटयाला आले आहे आणि ते तसेच जगले पाहिजे त्यात अवहेलना, नकार दुःख हतबलता काही नसते. जीवनाचा एक अपरिहार्य भाग म्हणून त्यांच्या व्यक्ती आपल्या दुःखाकडे आणि दारिद्रयाकडे पाहतात.

कथेनुसार त्यांचे निवेदन बदलत जाते आणि या निवेदनानुसार त्यांच्या कथेत संवाद आलेले असतात त्यामुळे कथा परिणामकारक बनतात. यांच्या कथाविश्वात संदिग्ध, धुसर असे काही नसते. आहे त्या जीवनाला ते सरळपणे भिडतात. पण त्यावेळी . त्यांच्यात अस्वस्थता, हतबलता नसते तर एक तटस्थश, गंभीर, संवेदनशील लेखक त्यांच्या लेखणीतून साकार होतो. यामुळे कथेतील पात्राविषयी त्याना सहानुभूती आहे. पण त्यांच्या कथा विश्वात अभिव्यक्तीच्या संदर्भात तो तटस्थ असतात.

शेळक्यांच्या पात्रापुढे दैनंदिन जीवन जगणे आणि जगवणे हाच मुलभूत प्रश्न असतो त्यांची शरीराची अन्नाची भूक महत्त्वाची असते यासाठीच त्यांची पात्रे जगताना आणि झगडताना दिसतात. म्हणूनच प्रसंगी महारोग झालेल्या नवऱ्याला बरे करणारी स्त्री त्यांच्या कथेत भेटते यामुळे त्यांच्या कथेत जनवादी जाणीव असलेली दिसते साहजिकच ते व्यक्ती आणि समष्टीचा विचार करताना दिसतात. या समष्टीवर नियतीचा काही एक प्रभाव असतो. व याचे ते यथार्थ चित्रण कथेच्या माध्यमातून साकार करतात. एकत्र कुटुंब पद्धतीतील ताणतणाव ताठा सारख्या कथेतून साकार होतात. विशेषतः पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांची होणारी कोंडी दिसून येते. यात विधवा, सासु, सुना, बायको अन्याय झालेली खालच्या वर्गातील स्त्री, पळून जाणारी स्त्री अशा अनेक नात्यामध्ये बद्ध झालेली आणि व्यक्त झालेली स्त्री भेटते.

उद्धव ज. शेळके आपल्या कथेतून विदर्भातील जीवनाचे चित्रण करीत होते तेथील लहरी मान्सुनमुळे मोडकळीस आलेले जनजीवन, तेथील लोकाचार तेथील पारंपारिकता, तेथील दारिद्रय, दुष्काळ, माणसाची जगण्याची प्रवृत्ती, विविधता सर्वसामान्य वर्ग इत्यादी अनेक गोष्टींचे आणि घटकांचे चित्रण शेळके करतात गरीबीमुळे ओढग्रस्त बनलेले रूढीशरण जीवन शेळक्यांच्या कथात आढळते.

उद्धव ज. शेळके यांच्या कथेचे मूल्यमापन करताना आनंद यादव लिहितात "उद्धव शेळके हे त्या दृष्टीने व्यंकटेश माडगूळकरांच्या मांडीला मांडी खेटून बसल्यासारखे वाटतात. माडगूळकरानी माणदेशी ग्रामीण जीवन तेवढयाच ताकदीने आपल्या कथेतून रेखाटले अर्थात प्रदेशानुसार माणसामाणसात फरक पडतो. संस्कृतीच्या रंगात वेगवेगळया छटा असतात धंदे काही प्रमाणात वेगळे असतात. याना जोडूनच लेखकाचे एक खास असे व्यक्तिमत्व असते. त्यानुसारही त्या त्या कथान वेगळा रंग लाभतो. उद्धव ज. शेळक्यांच्या कथाना ही वैशिष्ट्ये लाभलेली आहेत. तरीही ग्रामीण जीवनातील असाहयता, दैवाधीनता, दारिद्र्य भोगत राहण्याची मौनी वृती यावर त्यानी भर दिलेला आहे. शिवाय त्यांच्या खास तिकडील प्रादेशिक भाषेने एक वेगळाच गोडवा निर्माण केलेला आहे. त्यांना विदर्भातील माडगूळकर असे प्रा.एस.एस.भोसले यानी वर्तमानपत्रातील एका लेखात म्हटल्याचे आठवते ते इतिहासाच्या संदर्भात अगदी बरोबर आहे." (४)

अशा प्रकारे समर्थपणे वैदर्भीय जीवनाचे चित्रण करणारा निदान दुसरा वैदर्भीय लेखक अद्याप झालेला नाही. माडगूळकर, पाटील यांच्यापासून अनेकविध परिमाणे लाभत आलेल्या कथेला अधिक अधिक वास्तव बनवण्याचा प्रयत्न शेळक्यांनी केला आहे. पात्रांच्या माध्यमातून विदर्भाचे वास्वत चित्रण करताना ते कमालीचे तटस्थ असतात. पण उद्धव ज. शेळक्यांना वैदर्भीय मातीशी असलेले नाते टिकवता आले आहे. तत्कालीन वाङ्.मयीन परंपरा आणि कलावादी समीक्षा याना ते बळी पडल्याचे दिसते.

उद्धव ज. शेळके केवळ ग्रामीण जीवन चित्रण करून थांबत नाहीत तर शहरी मध्यमवर्गीयांच्या जीवन जाणिवा ही ते व्यक्त करू पाहतात. त्यामुळे एकाचवेळी शहरी आणि ग्रामीण अशा दोन पातळीवर लेखन करणारे उद्धव ज. शेळके सारखे लेखक अपवादानेच आढळतात. त्याना हया दोन्हीही धुरा सांभाळता आल्या असत्या का? हा प्रश्न उपस्थित करण्यापेक्षा ते पुढे पुढे रंजक स्वरूपाच्या लेखनाकडे वळल्याने उद्धव ज.

शेळक्यांनी आपल्या साहित्यातून जीवन जाणिवा बारकाईने व्यक्त केल्या नाहीत. तरीही वैदर्भीय ग्रामीण कथाकार आणि कादंबरीकार म्हणून उद्धव ज. शेळके यांचे योगदान महत्त्वाचे आहे हे मात्र नाकारता येत नाही.

-o-o-o-o-

## संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| १) | यादव, आनंद | ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या<br>मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे<br>तृतीय आवृती १९९३.(पृष्ठ १४) |
| २) | कोतापल्ले, नागनाथ | ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध<br>मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.<br>प्रथम आवृत्ती १९८५ (पृष्ठ २१) |
| ३) | चवरे, रा.गो. | मराठी कथा : प्रवृती आणि प्रवाह<br>मराठी जनसाहित्य परिषद अमरावती<br>प्रथम आवृती १९९५ (पृष्ठ २९३) |
| ४) | यादव, आनंद | ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या<br>मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे<br>तृतीय आवृती १९९३ (पृष्ठ २९) |


-o-o-o-o-